# पुणे महानगरपालिका
# स्थायी समिती
# कार्यपत्रिका क्र. ०९
# सभा क्र.११, दिनांक २९/०५/२०२५ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक तहकूब (बुधवार, दि. २८/०५/२०२५ रोजीची) सभा गुरूवार, दि. २९/०५/२०२५ रोजी दुपारी ४.०० (चार) वाजता मा. महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका भवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| मा. डॉ राजेंद्र ब भोसले | – | प्रशासक तथा महापालिका आयुक्त, पुणे मनपा |
| मा.ओमप्रकाश दिवटे | – | अति.महा.आयुक्त (वि) |
| मा.पृथ्वीराज बी.पी. | – | अति.महा.आयुक्त (ज) |
| मा.सौ.योगिता भोसले–निकम | – | नगरसचिव |
| मा. सौ. उल्का कळसकर | – | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| मा.सौ.संजीव वावरे | – | सहा.आरोग्य प्रमुख |
| मा. अनिरूध्द पावसकर | – | मुख्य अभि.(पथ) |
| मा. युवराज देशमुख | – | मुख्य अभि.(भवन) |
| मा. ॲड. निशा चव्हाण | – | मुख्य विधी अधिकारी |
| मा. सौ. मनिषा शेकटकर | – | मुख्य अभि.(विद्युत) |
| मा.संदीप कदम | – | उप आयुक्त (घ.क.व्यव.) |
| मा. आशा राऊत | – | शिक्षणाधिकारी (शिक्षण मंडळ ) |
| मा. गोजारी | – | अधि.अभि. (मलनिःसारण) |

मा. प्रशासक – सभेला सुरूवात करावी.
नगरसचिव – सभेला सुरुवात करण्यात येत आहे.

**<u>वृत्तांत कायम करणे</u>**

मा. स्थायी समिती सभा क्र. ०८, दि. १६/०५/२०२५, सभा क्र. ०९, दि. २०/०५/२०२५ व सभा क्र. १०, दि. २८/०५/२०२५ असे एकूण ३ वृत्तांत कायम करण्यात आले.

**<u>कार्यपत्रिकेवरील विषय</u>**

**<u>उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा</u>**

**विषय क्र.१३६**

उप आयुक्त, परिमंडळ क्र.३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील सिंहगड रोड, धनकवडी-सहकारनगर, व वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्द्यांबाबतची <u>माहे एप्रिल २०२५</u> चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ क्र.३ यांचे जा.क्र.उआप-३/१४१४, दि.२१/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.१३७**

उप आयुक्त, परिमंडळ क्र.४ कार्यालयाचे नियंत्रणाखालील हडपसर-मुंढवा, वानवडी-रामटेकडी व कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्द्यांबाबतची <u>माहे मार्च २०२५</u> चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ क्र.४ यांचे जा.क्र.उआप-४/१४३८, दि.२२/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**<u>माहितीसाठी आलेले विषय</u>**

**विषय क्र.१३८**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.५, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१६/०४/२०२५ ते दि.३०/०४/२०२५ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.५/११५, दि.१९/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.१३९**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.५, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.०१/०४/२०२५ ते दि.१५/०४/२०२५ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.५/११६, दि.१९/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.१४०**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०५ (१) अन्वये दि.२६/०४/२०२५ अखेर संपलेल्या आठवड्याचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०६ (१) (अ) अनुसरून दि.२६/०४/२०२५ अखेर संपणाऱ्या आठवड्याचा मा. मुख्यलेखापरीक्षक यांनी जा.क्र.मुलेप/४१८, दि.२३/०५/२०२५ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा. मुख्यलेखापरीक्षक यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र र.रु.५,३५,५४२/- चा तक्ता माहितीसाठी.

मा. प्रशासक – वसूलपात्र रक्कम वसूल करून स्थायी एक महिन्यात समितीसमोर अहवाल सादर करावा.

**निर्णय– सदरचा अहवाल वसूलपात्र रक्कम वसूल करून एक महिन्यात स्थायी समितीसमोर सादर करावा.**

**विषय क्र.१४१**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०५ (१) अन्वये दि.१२/०४/२०२५ अखेर संपलेल्या आठवड्याचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०६ (१) (अ) अनुसरून दि.१२/०४/२०२५ अखेर संपणाऱ्या आठवड्याचा मा. मुख्यलेखापरीक्षक यांनी जा.क्र.मुलेप/४१६, दि.२३/०५/२०२५ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा. मुख्यलेखापरीक्षक यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र र.रु.१७,९६,०२६/- चा तक्ता माहितीसाठी.

मा. प्रशासक – वसूलपात्र रक्कम वसूल करून स्थायी एक महिन्यात समितीसमोर अहवाल सादर करावा.

**निर्णय– सदरचा अहवाल वसूलपात्र रक्कम वसूल करून एक महिन्यात स्थायी समितीसमोर सादर करावा.**

**विषय क्र.१४२**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०५ (१) अन्वये दि.०५/०४/२०२५ अखेर संपलेल्या आठवड्याचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०६ (१) (अ) अनुसरून दि.०५/०४/२०२५ अखेर संपणाऱ्या आठवड्याचा मा. मुख्यलेखापरीक्षक यांनी जा.क्र.मुलेप/४१५, दि.२३/०५/२०२५ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा. मुख्यलेखापरीक्षक यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र र.रु.१६,५३,९२४/- चा तक्ता माहितीसाठी.

मा. प्रशासक – वसूलपात्र रक्कम वसूल करून स्थायी एक महिन्यात समितीसमोर अहवाल सादर करावा.

**निर्णय– सदरचा अहवाल वसूलपात्र रक्कम वसूल करून एक महिन्यात स्थायी समितीसमोर सादर करावा.**

**विषय क्र.१४३**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०५ (१) अन्वये दि.१९/०४/२०२५ अखेर संपलेल्या आठवड्याचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०६ (१) (अ) अनुसरून दि.१९/०४/२०२५ अखेर संपणाऱ्या आठवड्याचा मा. मुख्यलेखापरीक्षक यांनी जा.क्र.मुलेप/४१७, दि.२३/०५/२०२५ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा. मुख्यलेखापरीक्षक यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र र.रु.७३,६९,३९४/- चा तक्ता माहितीसाठी.

मा. प्रशासक – वसूलपात्र रक्कम वसूल करून स्थायी एक महिन्यात समितीसमोर अहवाल सादर करावा.

**निर्णय– सदरचा अहवाल वसूलपात्र रक्कम वसूल करून एक महिन्यात स्थायी समितीसमोर सादर करावा.**

<u>सर्वात कमी रकमेचे टेंडर्स</u>

**विषय क्र.१४४**

सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या अखत्यारीतील पावसाळी गटाराची साफसफाई व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. SARTHAK CONSTRUCTION यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६७,६४,८०५/- पेक्षा १५.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५७,५०,०८४=२५ अधिक जीएसटी र.रु.१०,३५,०१५/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.१७,५११/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.६८,०२,६१०=२५ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/१४०, दि.२१/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१४५**

सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या अखत्यारीतील विठ्ठलवाडी एस.टी.पी. कडे येणाऱ्या मुख्य मलवाहिनीची देखभाल व दुरुस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. TUKARAM RANGNATH ANARSE यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६३,२८,२३२/- पेक्षा ३७.७६०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३९,३८,६९१=६ अधिक जीएसटी र.रु.७,०८,९६४/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.३२,४२७/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.४६,८०,०८२=६ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/१४९, दि.२६/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१४६**

नगररोड क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत नव्याने समविष्ट २३ गावांपैकी वाघोली गावातील नाल्याची साफसफाई व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/s. J.B. CHAVAN यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४५,३१,०८०/- पेक्षा ५०.९९९% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२२,२०,२७४=५१ अधिक जीएसटी र.रु.०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.४,६६,९४९/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.२६,८७,२२३=५१ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (१३-०३-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/१५०, दि.२६/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१४७**

ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत नायडू पंपिंग स्टेशन कडे येणाऱ्या मुख्य मालवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/s. J.B. CHAVAN यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६३,०३,१२७/- पेक्षा ३८.८८०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३८,५२,४७१=२२ अधिक जीएसटी र.रु.६,९३,४४५/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.६२,२४५/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.४६,०८,१६१=२२ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (१२-०३-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/१५१, दि.२६/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१४८**

ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालयाच्या अखत्यारीतील नाला साफसफाई व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/s. B.N. CHAVAN यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.७९,९९,६२०/- पेक्षा ५०.९९९% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३९,१९,८९३=८ अधिक जीएसटी र.रु.०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.३९,१९,८९३=८ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (०४-०३-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/१५२, दि.२६/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१४९**

ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत भैरोबा पंपिंग स्टेशन कडे येणाऱ्या मुख्य मालवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/s. J.B. CHAVAN यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६३,०२,४८४/- पेक्षा ३८.८८०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३८,५२,०७८=२२ अधिक जीएसटी र.रु.६,९३,३७४/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.६२,२४५/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.४६,०७,६९७=२२ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (१२-०३-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/१५३, दि.२६/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१५०**

कोथरूड बावधन क्षेत्रीय कार्यालयाच्या अखत्यारीतील रामनदी व सुतारदरा परिसरातील मुख्य मलवहिनींची देखभाल व दुरुस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. SHREE SAI UDYOG यांचे टेंडर सर्वात कमी

रकमेचे (टेंडर र.रु.६३,००,९३९/- पेक्षा ३१.९९% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४२,८५,२६८=६१ अधिक जीएसटी र.रु.७,७१,३४८/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.६४,८५४/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.५१,२१,४७०=६१ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/१५४, दि.२६/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१५१**

येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत कल्याणीनगर पंपिंग स्टेशन कडे येणाऱ्या मुख्य मालवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/s. B.N. CHAVAN यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६३०२३६८/- पेक्षा ४६.०००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३४०३२७८=७२ अधिक जीएसटी र.रु.६१२५९०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.६२२४५/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.४०७८११३=७२ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (११-०३-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/१५५, दि.२६/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१५२**

येरवडा कळस धानोरी क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत फुलेनगर पंपिंग स्टेशन कडे येणाऱ्या मुख्य मालवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/s. B.N. CHAVAN यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६३०२८१४/- पेक्षा ४६% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३४०३५१९=५६ अधिक जीएसटी र.रु.६१२६३४/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.६२२४५/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.४०७८३९८=५६ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (११-०३-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/१५६, दि.२६/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१५३**

कोथरूड बावधन क्षेत्रीय कार्यालयाच्या अखत्यारीतील एरंडवणा एस.टी.पी. कडे येणाऱ्या मुख्य मलवाहिनीची देखभाल व दुरुस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. SHREE SAI UDYOG यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६३०३०७३/- पेक्षा ३१.९९% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४२८६७१९=९५ अधिक जीएसटी र.रु.७७१६१०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.६२२६०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.५१२०५८९=९५ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/१५७, दि.२६/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**संकीर्ण**

**विषय क्र.१५४**

मौजे लोहगाव, धानोरी, कळस, वडगावशेरी, येरवडा व खराडी या गावामधील संरक्षण विभागाच्या आस्थापना लगतच्या निषिद्ध क्षेत्रामधील मिळकतीच्या मोजणीचे काम भूमी अभिलेख विभागामार्फत करण्यात आलेले असून मोजणीच्या मोजणी शुल्क पोटी र.रु.५६,०४,०००/- अदा करणेकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६७ (३) क अन्वये अदा करणेस मान्यतता प्राप्त असून सदर बाबीची माहिती मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेकडे अवलोकनार्थ करणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/श.आ./१४२, दि.२१/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१५५**

घोरपडी येथील पुणे-मिरज रेल्वे लाईनवर रेल्वे उड्डाणपूल बांधणे (ROB-I, गेट क्र.५८६) या कामासाठी OHE shifting charges र.रु.१,०५,३७,२९८/- इतकी रक्कम रेल्वे विभागास जमा करणेसाठी मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/१४६, दि.२२/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१५६**

प्रभाग क्र १९ जुना मोटर स्टँड चौक ते अलंकार मेडिकल पर्यंत रस्ता कॉक्रीट करणे व इतर तदनुषंगीक कामे करणे या कामासाठी आवश्यक असणारी उर्वरित रक्कम (र.रु.३,८९,६१,५९६/-) महाराष्ट्र म.न.पा. अधिनियम १९४९ कलम ७२ (ब) अन्वये प्रकल्प पूर्ण होईपर्यंत उपलब्ध करून घेणेकामी उर्वरित खर्चाचे उत्तरदायित्व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२ (ब) अन्वये स्विकारण्यास मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१६०, दि.२७/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१५७**

प्रभाग क्र.४१ कोंढवा बु. कात्रज स.नं.२० पुणे या ठिकाणी पुणे महानगरपालिकेच्या नवीन बांधलेल्या शाळा इमारतीमध्ये सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा सुरु करणेकरिता खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जावक क्र.मआ/प्राथमिक/७४, दि.३०/०४/२०२५ वर झालेला मा. शिक्षण समिती ठराव क्र.०४, दि.२०/०५/२०२५ विचारासाठी.

१) प्रभाग क्र.४१ कोंढवा बु. कात्रज सर्व्हे नं.२० पुणे या ठिकाणी नवीन बांधलेली इमारत ३०/०४/२०२५ पर्यंत पूर्ण होईल यां अटीस अधीन राहून या ठिकाणी इंग्रजी माध्यमाची नवीन प्राथमिक शाळा जून २०२५ पासून सुरु करणेस.
२) या शाळेसाठी आवश्यक शिक्षण सेवक पवित्र पोर्टलद्वारे नेमणेस तसेच शिक्षकेतर कर्मचारी विहित कार्यपद्धती अनुसरून नेमणेस,
३) या शाळेसाठी आवश्यक कर्मचारी, फर्निचर, विद्यार्थ्यांच्या DBT साठी व इतर शालेय खर्चासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करणेस व खर्चास मान्यता मिळणेस.
४) सदर प्रस्तावास मा. शिक्षण समिती, मा. स्थायी समिती व मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेस

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१५८**

कै. बबनराव गबाजी टिंगरे विद्यालय, मुंजाबावस्ती, धानोरी, पुणे या ठिकाणी पुणे महानगरपालिकेच्या नवीन बांधलेल्या शाळा इमारतीमध्ये सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून माध्यमाची प्राथमिक शाळा सुरु करणेकरिता खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जावक क्र.मआ/प्राथमिक/७५, दि.३०/०४/२०२५ वर झालेला मा. शिक्षण समिती ठराव क्र.०५, दि.२०/०५/२०२५ विचारासाठी.

१) सरस्वती विद्यामंदिर मनपा शाळा क्र.१०२ मुलींची इंग्रजी माध्यम टिंगरेनगर या ठिकाणी सुरु असलेली राज्य शिक्षण मंडळाची (SSC BOARD) इंग्रजी माध्यमाची शाळा पुणे पेठ धानोरी स.नं.२९/०१/२३, २९/०१/२४ या ठिकाणी स्थलांतरित करणेस व सदर स्थलांतरास मा. शिक्षण समिती, मा. स्थायी समिती व मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेस.
२) सदर शाळेत इ.८वी चा वर्ग सुरु करणेस तसेच इ.८वी च्या वर्गासाठी पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक नेमणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेस,

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१५९**

स्व. खासदार विठ्ठल तुपे (पाटील) इंग्लिश स्कूल, ससाणेनगर, काळे पडळ, हडपसर, पुणे २८ या ठिकाणी पुणे महानगरपालिकेच्या नवीन बांधलेल्या शाळा इमारतीमध्ये सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा सुरु करणेकरिता खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जावक क्र.मआ/प्राथमिक/७६, दि.३०/०४/२०२५ वर झालेला मा. शिक्षण समिती ठराव क्र.०६, दि.२०/०५/२०२५ विचारासाठी.

१) स्व. खासदार विठ्ठल तुपे (पाटील) सेमी इंग्लिश स्कूल, ससाणेनगर, काळे पडळ, हडपसर, पुणे २८ या ठिकाणी नवीन बांधलेली इमारत ३०/०४/२०२५ पर्यंत पूर्ण होईल या अटीस अधीन राहून या ठिकाणी इंग्रजी माध्यमाची नवीन प्राथमिक शाळा जून २०२५ पासून सुरु करणेस.
२) या शाळेसाठी आवश्यक शिक्षण सेवक पवित्र पोर्टलद्वारे नेमणेस तसेच शिक्षकेतर कर्मचारी विहित कार्यपद्धती अनुसरून नेमणेस.
३) या शाळेसाठी आवश्यक कर्मचारी, फर्निचर, विद्यार्थ्यांच्या DBT साठी व इतर शालेय खर्चासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करणेस व खर्चास मान्यता मिळणेस.
४) सदर प्रस्तावास मा. शिक्षण समिती, मा. स्थायी समिती व मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेस.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१६०**

नगरसचिव कार्यालयाकडील सेवानिवृत्त सेवक श्री. दादाभाऊ पोटे (हुद्दा- कार्यालय अधीक्षक) यांचेवरील कारवाई बाबत मा. नगरसचिव यांचे जा.क्र.६८७, दि.२६/०५/२०२५ चे पत्र.

नगरसचिव – सन २०१९ नंतर तत्कालीन मा. नगरसचिव यांनी सहानुतीच्या दृष्टिकोनातून त्यांच्यावर कारवाई करणे योग्य समजले नाही. तद्नंतर श्री. पोटे हे पूर्णवेळ रजेवर गेल्याने पुढील कार्यकालात देखील त्यांचेवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. आता ते मेडिकली अनफिट झाल्यामुळे आणि मेडिकल बोर्डाने त्यांना अनफिट केल्यामुळे हा ठराव स्थायी समितीसमोर आणला आहे.

मा. प्रशासक – त्यांना शिक्षा दिली आहे का?

नगरसचिव– नाही, त्याअगोदरच त्यांचा मेडिकली प्रॉब्लेम झाला होता.

मा. प्रशासक – त्यांच्यावर ठपका ठेवून पुढील कार्यवाही करा.

**निर्णय – सदर विषयामध्ये सदर सेवकावर ठपका ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

**विषय क्र.१६१**

समान पाणीपुरवठा प्रकल्प पॅकेज ४ अंतर्गत येणाऱ्या टाक्यांकरिता सीमाभिंत / रीटेनिंग वॉल बांधणे कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ७ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. J P Enterprises यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.७,६६,९४,०९०/- पेक्षा २२.५०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५,९४,३७,९१९=७५ अधिक जीएसटी र.रु.१,०६,९८,८२६/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.१२,७७,५१५=७१ पर्यंत अधिक मटेरीअल टेस्टिंग चार्जेस र.रु.२,५९,३९०/- पर्यंत अशी एकूण र.रु.७,१६,७३,६५१=७५ तसेच वर्क ऑर्डर दिनांका पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.१००००००००) पर्यंत तसेच अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/६०; दि.२४/०४/२०२५ चे पत्र.

**( सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि.२०/०५/२०२५ च्या सभेत ठरले होते.)**

मा. प्रशासक – पुढील सभेला घ्या.

**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र.१६२**

बिबवेवाडी स.क्र. ६२२ व ६२४ येथील पाण्याच्या टाकीमागील अस्तित्वातील सीमाभिंत व घर पाडून त्याठिकाणी नव्याने Retaining Wall, Compound Wall, घर बांधणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. B P Khodade And Company यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४,४५,१६,७४४/- पेक्षा २६.१००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३,२८,९७,८७३=८२ अधिक जीएसटी र.रु.५९,२१,६१७/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.७,११,४२२=४४ पर्यंत अधिक मटेरीअल टेस्टिंग चार्जेस र.रु.६०,३५०/- पर्यंत अशी एकूण र.रु.३,९५,९१,२६२=८२ तसेच वर्क ऑर्डर दिनांकापासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.२७५०००००) पर्यंत तसेच अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/१०९; दि.१४/०५/२०२५ चे पत्र.

**( सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि.२०/०५/२०२५ च्या सभेत ठरले होते.)**

मा. प्रशासक – पुढील सभेला घ्या.

**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र.१६३त्वर्य**

प्राथमिक शिक्षण विभागाकडील असणाऱ्या शाळेलगत इयत्ता ८वी, ९वी, व १०वी चे वर्ग व ज्युनिअर कॉलेज सुरु करणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माध्यमिक व तांत्रिक/१५९, दि.२७/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – पुढील सभेला घ्या.

**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र.१६४त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील संरक्षण व एअरफोर्स विभागाच्या हद्दी लगत प्रतिबंधित क्षेत्रामधील मिळकतींचा विद्यमान जमीन वापराचे नकाशे ड्रोन सर्वेक्षण, टोटल स्टेशन मशीनद्वारे सर्वेक्षण करुन अद्यावत करणे, तसेच जागेवरी प्रत्यक्ष मिळकतीच्या वापराबाबतची माहिती मोबाईल ॲपद्वारे संकलित करणे या कामाकरीता मे. मोनार्च सर्वेअर्स ॲन्ड इंजिनिअरिंग कन्सल्टंट्स प्रा. लि. पुणे या संस्थेची प्रा.ली.पुणे ७७/२००६ चे अनुषंगाने प्रतिबंधित जागेचा सर्व्हे करणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये कन्सल्टंट म्हणून नेमणूक करणेस, त्याकरिता त्यांचे समवेत करारनामा करणेस तसेच सदर कामाकरिता र.रु.१,६९,४६,४००/- अदा करणेबाबत दिलेल्या मान्यतेची व अंमलबजावणीची बाब मा. स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शहरअभियंता/१६४, दि.२७/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.१६५त्वर्य**

पाषाण राम नदी येथील 01 mld stp प्लांट करता वीज पुरवठा करणे व इतर तदनुषंगिक कामे करणे कामी कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. NEW SOLAR ELECTRICALS AND ELECTRONICS यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३६३०८४२/- (अधिक जी.एस.टी.) पेक्षा १९.१९% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२९३४०८३=४२ पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रु.५२८१३५/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु.०/- अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.३४६२२१८=४२ पर्यंत काम करून घेणेस व सदरचे काम ब पाकीट उघडलेचे दिनांक (२१-०४-२०२५) पासून सुरु करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस व त्यानुसार केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र.मआ/विद्युत/१६९, दि.२८/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१६६त्वर्य**

पुणे महानगरपालिकेकडील नजीकच्या जमाखर्चाचा विचार करता र.रु.१५०.०० कोटी १२ महिने, ३६५/३६६ दिवस, ६ महिने/१८१ दिवस किंवा त्यापेक्षा कमी/जास्त कालावधीसाठी गुंतवणूक करणेस उपलब्ध होत असल्याने रक्कम रु.१५०.०० कोटी ३०% प्रमाणे मे. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०२४/प्र.क्र.१४/नवि-०४, दि.१४/०२/२०२४, दि.१९/०७/२०२४ नुसार राष्ट्रीयकृत बँकांसोबत ज्या खासगी बँका र.रु.१६००० कोटी पेक्षा जास्त नक्त मूल्य असणाऱ्या व मे. महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय २०२२/प्र.क्र.१२३/२२/कोषा-प्रशा-५ दि.२२/११/२०२३ च्या शासन निर्णयामधील अटींची पूर्तता करणाऱ्या खासगी बँकांमध्ये किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९२ नुसार सार्वजनिक कर्जरोख्यात किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, शासनाचे उपक्रम, शासनाच्या वित्तीय संस्था किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, यांच्या कर्जरोख्यांमध्ये किंवा ऋणपत्रांमध्ये गुंतवणूक करणेस, गुंतवणुकीचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना देणेस व आवश्यकता भासलेस सदरची गुंतवणूक मुदतपूर्व मोकळी करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुले/१७१, दि.२८/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१६७त्वर्य**

पुणे महानगरपालिकेकडील नजीकच्या जमाखर्चाचा विचार करता र.रु.३५०.०० कोटी १२ महिने, ३६५/३६६ दिवस, ६ महिने/१८१ दिवस किंवा त्यापेक्षा कमी/जास्त कालावधीसाठी गुंतवणूक करणेस उपलब्ध होत असल्याने रक्कम रु.३५०.०० कोटी ७०% प्रमाणे मे. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०२४/प्र.क्र.१४/नवि-०४, दि.१४/०२/२०२४, दि.१९/०७/२०२४ नुसार राष्ट्रीयकृत बँकांसोबत ज्या खासगी बँका र.रु.१६००० कोटी पेक्षा जास्त नक्त मूल्य असणाऱ्या व मे. महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय २०२२/प्र.क्र.१२३/२२/कोषा-प्रशा-५ दि.२२/११/२०२३ च्या शासन निर्णयामधील अटींची पूर्तता करणाऱ्या खासगी बँकांमध्ये किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९२ नुसार सार्वजनिक कर्जरोख्यात किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, शासनाचे उपक्रम, शासनाच्या वित्तीय संस्था किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, यांच्या कर्जरोख्यांमध्ये किंवा ऋणपत्रांमध्ये गुंतवणूक करणेस, गुंतवणुकीचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना देणेस व आवश्यकता भासलेस सदरची गुंतवणूक मुदतपूर्व मोकळी करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुले/१७२, दि.२८/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१६८त्वर्य**

प्रभाग क्र.२८ व बिबवेवाडी मुंजेरी स.नं.५८८ या जागेमध्ये पीपीपी तत्वावर अल्प दरामध्ये डायग्नोस्टिक सेंटर सुविधा १० वर्षे कालवधीकरीता कार्यान्वित करणेकामी बी-२ पध्दतीची निविदा प्रक्रिया VGF पध्दतीने राबविणेसाठी खालील बाबींस मा. स्थायी समिति मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/१८४, दि.२८/०५/२०२५ चे पत्र.

१. क्रस्ना डायग्नोस्टिक प्रा.लि., २४३/ हिस्सा नं.६ सीटीएस नं. ४५१९ चिंचवड स्टोशन चिंचवड पुणे - १९ प्रभाग क्र.२८ व बिबवेवाडी मुंजेरी स.नं.५८८ या जागेमध्ये पीपीपी तत्वावर अल्प दरामध्ये डायग्नोस्टिक सेंटर सुविधा कार्यान्वित करणेकामी VGF पध्दतीने प्रकल्प राबविणे व क्रस्ना डायग्नोस्टिक प्रा.लि., २४३/ हिस्सा नं.६ सीटीएस नं. ४५१९ चिंचवड स्टोशन चिंचवड पुणे -१९ यांना १० वर्षे कालावधीकरीता चालविणेस व १० वर्षानंतर तत्कालीन प्रचलित नियमानुसार १० वर्षे मुदतवाढ असे दोन मुदतवाढ देउन कराराने चालविणेस देणेस.
२. क्रस्ना डायग्नोस्टिक प्रा.लि., २४३/ हिस्सा नं.६ सीटीएस नं.४५१९ चिंचवड स्टोशन चिंचवड पुणे -१९ यांना र.रू.३,००,००,०००/- (अक्षरी र.रू. तीन कोटी फक्त) इतकी सदर प्रकल्पाकरीता पुणे मनपा हिस्सापोटी (Viability Gap Funding) तातडीने अदा करणेस
३. अत्याधुनिक स्वरूपाची पॅथोलॉजी लॅब, सीटीस्कॅन, एमआरआय इ. सुविधा चालविणेसाठी आवश्यक त्या सर्व परवानगी / मान्यता संबधित सक्षम विभागाकडून क्रस्ना डायग्नोस्टिक प्रा.लि. यांनी पुणे महानगरपालिका यांचे वतीने घेणेस.
४. काही अपरिहार्य कारणास्तव प्रस्तावित केलेल्या जागेवर प्रकल्प उभारणीसाठी अडचणी उद्भवल्यास प्रस्तुत प्रकल्पासाठी जागा बदल करण्याचे अधिकारी व प्रकरणी आवश्यक तो करारनामा करणेस व त्यातील कलमे ठरविण्याचा अधिकार मा. महापलिका आयुक्त यांना प्रदान करणेस.

५. क्रस्ना डायग्नोस्टिक प्रा.लि., २४३/ हिस्सा नं.६ सीटीएस नं. ४५१९ चिंचवड स्टोशन चिंचवड पुणे -१९ यांचेकडून प्रभाग क्र. २८ व बिबवेवाडी मुंजेरी स.नं.५८८ येथे अत्याधुनिक स्वरूपाची पॅथोलॉजी लॅब, सीटी स्कॅन, एमआरआय इ. सुविधा व क्रस्ना डायग्नोस्टिक प्रा.लि., यांना १० वर्षे कालावधीकरीता चालविणेस व १० वर्षानंतर तत्कालीन प्रचलित नियमानुसार १० वर्षे मुदतवाढ असे दोन मुदतवाढ देउन कराराने चालविणेस देणेकामी आवश्यक तो करारनामा करणेस व सदर करारातील कुठल्याही बाबतीत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस.
६. उर्वरीत रक्कम वर्गीकरणाव्दारे उपलब्ध करून देणेस.
७. मा. मुख्य सभा सदर प्रकरणी मान्यता देईल या भरश्यावर पुढील कार्यवाही करणेस.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१६९त्वर्य**

प्रधान मंत्री आवास योजने अंतर्गत Appointment of Project Management Consultant for Detailed Engineering and Project Management Consultancy (PMC) Services for Affordable housing Project Along with Architectural Services at Balewadi. 44(P) + 45(P) and Dhanori 7/1+7/2 (P) in Pune Municipal Corporation Limit. करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्स पैकी या कामाकरिता envirosafe consultants यांची प्रकल्प सल्लागार म्हणून १.११% टक्केवारी (स्वेच्छापत्र) प्रमाणे निविदा मंजूर करणेस व त्यांच्याशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र.मआ/PMAY/१७५, दि.२८/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७०त्वर्य**

प्रधान मंत्री आवास योजने अंतर्गत Appointment of Project Management Consultant for Detailed Engineering and Project Management Consultancy (PMC) Services for Affordable housing Project Along with Architectural Services at Kharadi S. No. 57 (Part) in Pune Municipal Corporation Limit. करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी या कामाकरिता MKDM STUDIO PVT LTD यांची प्रकल्प सल्लागार म्हणून १.११ % टक्केवारीप्रमाणे निविदा मंजूर करणेस व त्यांच्याशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/PMAY/१७७, दि.२८/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७१त्वर्य**

प्रधान मंत्री आवास योजने अंतर्गत Appointment of Project Management Consultant for Detailed Engineering and Project Management Consultancy (PMC) Services for Affordable housing Project Along with Architectural Services at Hadapsar S.No. 76 (P) in Pune Municipal Corporation Limit. करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्स पैकी या कामाकरिता Sandip Shikre & Associates यांची प्रकल्प सल्लागार म्हणून १.११ % टक्केवारीप्रमाणे निविदा मंजूर करणेस व त्यांच्याशी करारनामा करणेस मान्यता मिळणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/PMAY/७९, दि.२८/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७२त्वर्य**

प्रधान मंत्री आवास योजने अंतर्गत Appointment of Project Management Consultant for Detailed Engineering and Project Management Consultancy (PMC) Services for Affordable housing Project Along with Architectural Services at Vadgaon Khu. S. No. 39(P) +40 (P) and Kondhava Bu. S.no.43 (P) + 44 (P) in Pune Municipal Corporation Limit. करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी या कामाकरिता MKDM STUDIO PVT LTD यांची प्रकल्प सल्लागार म्हणून १.०२% टक्केवारीप्रमाणे निविदा मंजूर करणेस व त्यांच्याशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/PMAY/१७८, दि.२८/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७३त्वर्य**

पुणे शहराच्या पूर्व भागातील रस्त्याचे मायक्रोसरफेसिंगद्वारे पुनःडांबरीकरणाचे व तदनुषंगिक कामे करणे (पॅकेज-9) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Markolines Pavement Technologies Limited यांचे टेंडर सर्वात

कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६,३०,१३,५१५/- पेक्षा ३.९३% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६,०५,३७,०८३=८६ अधिक जी.एस.टी. र.रु.१,०८,९६,६७५/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- अधिक सल्लागार शुल्क र.रु.६,३०,१३५/- अशी एकूण र.रु.७,२०,६३,८९३=८६ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (१५-५-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१८०, दि.२८/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७४त्वर्य**

पुणे शहराच्या पश्चिम भागातील रस्त्याचे मायक्रोसरफेसिंगद्वारे पुनःडांबरीकरणाचे व तदनुषंगिक कामे करणे (पॅकेज-10) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Markolines Pavement Technologies Limited यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६,३०,१८,२५३/- पेक्षा ३.९३% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६,०५,४१,६३५=६६ अधिक जी.एस.टी. र.रु.१,०८,९७,४९४/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- अधिक सल्लागार शुल्क र.रु.६,३०,१८३/- अशी एकूण र.रु.७,२०,६९,३१२=६६ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (१५-५-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१८१, दि.२८/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७५त्वर्य**

१५ व्या वित्त आयोगाअंतर्गत कोथरूड डेपो ते कचरा ramp (पौड रस्ता) दरम्यान फुटपाथ करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/S. SUNRAJ CONSTRUCTION यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,२२,५१,६११/- पेक्षा २४.६२% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९२,३५,२६४=३७ अधिक जी.एस.टी. र.रु.१६,६२,३४८/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.५,०८,४५५/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.३४,१६०/- पर्यंत अशी एकूण र.रु.१,१४,४०,२२७=३७ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१८२, दि.२८/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – पुढील सभेला घ्या.

**निर्णय– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र.१७६त्वर्य**

सिंहगड रस्त्यावरील उड्डाणपुला खालील दुभाजक विकसन करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. JAY GANESH DEVELOPERS यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८४,७४,५६७/- पेक्षा ११.११०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७५,३३,०४२=६१ अधिक जी.एस.टी. र.रु.१३,५५,९४८/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.८८,८८,९९०=६१ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/१८५, दि.२८/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७७त्वर्य**

Setting up a 75 MTPD Dry (Mostly Textile/furniture etc.) Waste processing plant in Zone 2 of PMC along with its operation and maintenance for a period of 10+5 years (टेंडर क्र. PMC/SWM/2024-25/80) या कामाकरिता मे. ग्रीन पृथ्वी सोल्युशन्स एलएलपी, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडर रक्कम प्रकल्प उभारणी करीता र.रु. १३,०३,७५,०००/- (जीएसटी सहित) व १०+५ वर्ष कालावधी करीता देखभाल दुरुस्ती करीता प्रति मे. टन र.रु. ६६०/- ९% वार्षिक दरवाढ प्रमाणे असे एकूण र.रु. ६६,०८,५३,४४४/- (रु. सहासष्ट कोटी, आठ लक्ष, त्रेपन्न हजार चारशे चौरेचाळीस रुपये फक्त) पर्यंत काम करून घेणेकरिता पुढील १०÷५ वर्ष कालावधी करिता तरतूद उपलब्ध होणेकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ७२ (ब) नुसार मा.महा.आयुक्त यांच्या विषयपत्रातील नमूद तक्त्यानुसार आर्थिक तरतूद उपलब्ध करणेस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/घनकचरा/१८६, दि.२८/०५/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१७८त्वर्य**

Setting up a 75 MTPD Dry (Mostly Textile/furniture etc.) Waste processing plant in Zone 2 of PMC along with its operation and maintenance for a period of 10+5 years (टेंडर क्र. PMC/SWM/2024-25/80) कामी बी-२ पद्धतीने टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. ग्रीन पृथ्वी सोल्युशन्स एलएलपी, पुणे यांचे टेंडर दोघात कमी दराने (L-१ दराने) असल्याने त्यांचेकडून काम करून घेणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/घनकचरा/१८७, दि.२८/०५/२०२५ चे पत्र.

१) Setting up a 75 MTPD Dry (Mostly Textile/furniture etc.) Waste processing plant in Zone 2 of PMC along with its operation and maintenance for a period of 10+5 years (टेंडर क्र. PMC/SWM/2024-25/80) या कामाकरिता मे. ग्रीन पृथ्वी सोल्युशन्स एलएलपी, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडर रक्कम प्रकल्प उभारणी करीता र.रु.१३,०३,७५,०००/- (जीएसटी सहित) व १०+५ वर्ष कालावधी करीता देखभाल दुरुस्ती करीता प्रति मे. टन र.रु.६६०/- ९% वार्षिक दरवाढ प्रमाणे असे एकूण र.रु.६६,०८,५३,४४४/- (रु. सहासष्ट कोटी, आठ लक्ष, त्रेपन्न हजार चारशे चौरेचाळीस रुपये फक्त) पर्यंत काम करून घेणेस व त्यांचे बरोबर करारनामा करणेस.

२) सदर प्रकल्प मौजे हडपसर फायनल प्लॉट नं १०४, येथील रामटेकडी औद्योगिक वसाहत टी पी स्कीम येथील सुमारे ११ एकर एम. पी. आरक्षित जागेपैकी दक्षिणेकडील एक एकर जागेमध्ये राबविणे,

३) सदर कामाकरिता घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील CE19A123 या बजेटहेडवर प्रकल्प उभारणी खर्च करणेस व RE19A176 या अर्थशिर्षकावर प्रती मे.टन प्रमाणे देखभाल दुरुस्तीच्या प्रत्यक्ष होणाऱ्या कामानुसार देयके अदा करणेस.

मा. प्रशासक – मान्य करा.
मा. ॲड. निशा चव्हाण (विधी अधिकारी)– १५ वर्षाकरीता द्यायचे असेल तर त्यामध्ये जागेचा उल्लेख करावा लागेल.
मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन सभा समाप्त झाली.

**सही /– xxx**
**(योगिता भोसले)**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**दि. १७/०६/२०२५ रोजी वृत्तांत मंजूर.**

**सही /– xxx**
**(नवल किशोर राम)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**